

चिंचवडगावात उत्तर भारतीय बांधवांचा छठपुजा उत्सव दिमाखात साजरा

e Paper

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in | गुरुवार दिनांक 30/10/२०२५ | METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन || पिंपरी चिंचवड व पुणे || पान 4 || अंक 252 || RNI - MAHMAR /2021/51259 || metrocity924@gmail.com


# महाराष्ट्राचे 'स्टेट मन्युफॅक्चरिंग मिशन' सुरु करणार – मुख्यमंत्री

**पुणे - केंद्र सरकार राष्ट्रीय उत्पादन अभियान (नॅशनल मन्युफॅक्चरिंग मिशन) सुरु करत असताना त्याबरोबरीने महाराष्ट्र शासनही 'राज्य उत्पादन अभियान' सुरु करेल, अशी घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. तसेच राज्यात जागतिक दर्जाची 'ग्लोबल फ्रंटियर टेक्नॉलॉजी इन्स्टिट्यूट' स्थापन करण्यात येईल, असेही त्यांनी घोषित केले.**



नीती आयोगाच्यावतीने यशदा येथे 'रिइमॅर्जनिंग मॅन्युफॅक्चरिंग : इंडियाज रोडमॅप टू ग्लोबल लिडरशीप इन ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग' या विषयावर आयोजित 'द रोड टू इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026' या परिषदेत ते बोलत होते. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, नीती आयोगाचे मुख्य कार्यकारी अधिकारी बी. व्ही. आर. सुब्रमण्यम, नगरविकास राज्यमंत्री माधुरी मिसाळ, मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी, नीती आयोगाच्या डिस्टिंग्विश्ड फेलो देबजानी घोष, सीआयआयचे महासंचालक चंद्रजीत बॅनर्जी आदी उपस्थित होते.

मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रासंदर्भातील रोडमॅप असलेला अत्यंत चांगला अहवाल पुण्यात प्रकाशित केल्याबद्दल नीती आयोगाला धन्यवाद देऊन मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, पुण्यात या क्षेत्रातील उन्नत तंत्रज्ञान पाहायला मिळते. उत्पादन क्षेत्राच्या विकासासाठी नव्या विचाराने पुढे जावे लागेल. त्यासाठी फ्रंटियर टेक्नॉलॉजी आवश्यक आहे. नव्या तंत्रज्ञानामुळे जागतिक स्पर्धेत स्थान पक्के करण्यासोबत नव्या क्रांतीला सामोरे जाणे गरजेचे आहे. आज 'एआय', क्वांटम कंम्प्युटिंग आणि सेमीकंडक्टर्स या तीन स्तंभांनी प्रत्येक क्षेत्राला मोठ्या प्रमाणात प्रभावित केले आहे. त्याचा फायदा उठविण्याचा आम्ही प्रयत्न करत आहोत, असेही ते म्हणाले.

मुख्यमंत्र्यांनी पुढे नमूद केले की, देशाला प्रगत उत्पादन (ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंग) क्षेत्रात पुढे नेताना त्याचे नेतृत्व महाराष्ट्र करेल, त्यासाठी राज्याचे मॅन्युफॅक्चरिंग मिशन सुरु केले जाईल. राज्याने विकसित महाराष्ट्र 2047 व्हिजन तयार केले असून मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील परिवर्तन हादेखील त्याचा एक भाग आहे. ॲडव्हान्स्ड मॅन्युफॅक्चरिंगला चालना दिली जाणार असून त्यामुळे या क्षेत्रात मोठे परिवर्तन दिसेल.

इतर देशांना भारताकडे आकर्षित करताना यासाठी आवश्यक सुविधा निर्माण कराव्या लागतील.

असे केल्यास उत्तम तसेच कल्पक बुद्धिमत्ता असलेल्यांना आपल्याकडे आकर्षित करता येईल. महाराष्ट्राने इज ऑफ डुइंग बिझनेस अंतर्गत कृतीदल स्थापन केला असून त्याअंतर्गत 100 सुधारणा करणे निश्चित केले असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले.

महाराष्ट्र हे देशाचे डेटा सेंटर कॅपिटल झाले आहे. पुणे मॅन्युफॅक्चरिंग, तंत्रज्ञान क्षेत्राचे शहर आहे. पुणे व मुंबईदरम्यान क्वांटम कॉरिडॉर तयार करण्याचे राज्य शासनाने निश्चित केले आहे. नवी मुंबई डेटा सेंटर शहर असून पुणे-मुंबई दरम्यान इनोव्हेशन सिटी उभारण्यात येणार आहे.

# बच्चू कडू यांच्या नेतृत्वात एल्गार मोर्चा ; प्रमुख मागण्या कोणत्या?

नागपूर : प्रहार जनशक्ती पक्षाचे नेते आणि माजी मंत्री बच्चू कडू यांच्या नेतृत्वात एल्गार मोर्चा काढण्यात आला आहे. बैलगाड्या, ट्रॅक्टर आणि इतर वाहनांतून आंदोलक नागपूरमध्ये दाखल होत आहेत. मागण्यांसाठी बच्चू कडूंसह आंदोलक आक्रमक झाले असून, नागपूरमध्ये चक्का जाम आंदोलन सुरु करण्यात आले आहे. याचा वाहतुकीला फटका बसला असून, बच्चू कडू यांनी आठ मागण्या राज्य सरकारकडे केलेल्या आहेत.



आधीच कर्जमाफीची मागणी होत असताना राज्याच्या अनेक भागात अतिवृष्टी झाली. त्यामुळे शेतकऱ्यांना मोठा फटका बसला आहे. शेतकऱ्यांना भेडसावत असलेल्या वेगवेगळ्या मुद्द्यांसंदर्भात आता बच्चू कडूंनी राज्य सरकारकडे काही मागण्या केल्या आहेत.

**बच्चू कडू यांच्या मागण्या कोणत्या?**

कोणत्याही अटी आणि शर्थींशिवाय शेतकऱ्यांचे संपूर्ण कर्ज त्वरित माफ करावे. नियमित कर्ज परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांसह सर्व शेतकऱ्यांचा सात बारा कोरा करावा. पीक कर्जाबरोबरच, मध्यम मुदतीचे, पॉली हाऊस, शेड नेट, जमीन सुधारणा, सिंचन सुविधांसह सर्व कर्जांचा कर्जमाफीमध्ये समावेश करण्यात यावा.

वर्ष 2025-26 साठी ऊसाला 9 टक्के रिकव्हरीसाठी प्रति टन 4300 रुपये आणि वर प्रति टक्का रिकव्हरीसाठी 430 रुपये एफआरपी द्यावा. आतापर्यंतची थकीत एफआरपीची रक्कमही शेतकऱ्यांना देण्यात यावी.

कांद्याला किमान प्रति किलो 40 रुपये भाव देण्यात यावा.

कांद्यावरील निर्यातबंदी, किमान निर्यात मूल्य आणि निर्यात कर कायमस्वरुपी बंद करावा.

भाव पाडण्यासाठी होत असलेला नाफेड व एनसीसीएफचा वापर बंद करावा आणि या संस्थांचा उपयोग शेतकऱ्यांच्या कांद्याला योग्य भाव मिळेल यासाठी करावा.

दुधाला उत्पादन खर्चावर आधारित रास्त भाव दिला जावा. गायीच्या दुधाला किमान 50 रुपये मूळ दर आणि म्हशीच्या दुधाला 65 रुपये प्रति लिटर दर द्यावा.

दूध क्षेत्राला एफआरपी व रेव्हेन्यू शेअरिंगचे धोरण लागू करावे. दूध भेसळ रोखण्यासाठी सरकारने ठोस धोरण तयार करावे.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 30/10/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# ‘एमआयटी एडीटी’ विद्यापीठात ‘क्वासार-2025’ ला सुरुवात

## दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत देशभरातील डिझाइन क्षेत्रातील तज्ज्ञ, संशोधक व विद्यार्थी सहभागी होणार

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पुणे : एमआयटी आर्ट, डिझाइन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाच्या एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन (एमआयटी-आयडी) तर्फे विद्यापीठाची प्रमुख राष्ट्रीय डिझाइन परिषद ‘क्वासार २०२५ – Designing What’s Next’ ही ३० व ३१ ऑक्टोबर २०२५ रोजी आयोजित करण्यात आली आहे.**




सर्जनशीलता आणि नवोपक्रमाचा उत्सव म्हणून साकारलेली ही दोन दिवसीय परिषद डिझाइनच्या भविष्यदृष्टीचा शोध घेणार असून तिचा प्रभाव उद्योग, तंत्रज्ञान आणि समाज या सर्व क्षेत्रांवर अधोरेखित करण्याचा उद्देश आहे. देशभरातील नामवंत डिझाइन तज्ज्ञ, उद्योगक्षेत्रातील व्यावसायिक, संशोधक, प्राध्यापक आणि विद्यार्थी या परिषदेत सहभागी होणार असल्याची माहिती येथे आयोजित पत्रकार परिषदेत एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइनचे अधिष्ठाता डॉ. नचिकेत ठाकूर यांनी दिली.डॉ. ठाकूर म्हणाले, “एमआयटी इन्स्टिट्यूट ऑफ डिझाइन ही देशातील अव्वल डिझाइन संस्थांपैकी एक असून, क्वासारच्या माध्यमातून पुढील दोन दिवस विद्यापीठात व्याख्याने, चर्चासत्रे, संशोधन पोस्टर सादरीकरणे, डिझाइन प्रदर्शने आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. तसेच कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित दृश्य संवाद, सर्जनशील अनुभव, पॅकेजिंग डिझाइन, स्टॉप-मोशन ॲनिमेशन, ट्रान्सपोर्टेशन डिझाइन, UI/UX आणि मटेरियल इनोव्हेशन यांसारख्या विषयांवरील कार्यशाळाही आयोजित केल्या जाणार आहेत,” असे त्यांनी सांगितले.कार्यक्रमाच्या सर्जनशीलतेला अधिक रंगतदार करण्यासाठी आंतर महाविद्यालयीन सांस्कृतिक स्पर्धा देखील आयोजित करण्यात आल्या असून त्यामध्ये, आलाप – गायन स्पर्धा, स्वरफ्युजन – वाद्य संगीत स्पर्धा, अभिव्यक्ती – एकपात्री अभिनय स्पर्धा, माइक ड्रॉप – स्टँडअप कॉमेडी स्पर्धा, नृत्यवर्स – समूह नृत्य स्पर्धा यांचा समावेश आहे. या स्पर्धांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना आपल्या कल्पकतेचा आणि कलागुणांचा आविष्कार दाखविण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

**चौकट : डिझाइन क्षेत्रातील प्रभावी**

उपक्रमसहाय्यक प्राध्यापक डॉ. हर्षित देसाई यांनी सांगितले की, “या परिषदेच्या निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या ‘डिझाइन रिसर्च पोस्टर स्पर्धेस’ देशभरातील ४० हून अधिक डिझाइन महाविद्यालयांमधील विद्यार्थी आणि प्राध्यापकांकडून उत्साहवर्धक प्रतिसाद प्राप्त झाला आहे. या दोन दिवसीय परिषदेतील ५०० हून अधिक प्रतिनिधींच्या सहभागामुळे ही परिषद देशातील डिझाइन क्षेत्रातील सर्वाधिक व्यापक आणि प्रभावी उपक्रम ठरणार आहे.”

# पिंपरी चिंचवडमध्ये होणार आयएफएससी आशियाई क्लाइंबिंग चॅम्पियनशिप स्पर्धा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिका, इंडियन माउंटेनिअरिंग फाउंडेशन (आयएमएफ) आणि महाराष्ट्र स्पोर्ट क्लाइंबिंग असोसिएशन (एमएससीए) यांच्या संयुक्त विद्यमाने महाराष्ट्रात प्रथमच आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.**




ही स्पर्धा १ नोव्हेंबर ते ४ नोव्हेंबर २०२५ या कालावधीत पिंपळे सौदागर येथील योगा पार्कमधील अत्याधुनिक स्पोर्ट क्लाइंबिंग कॉम्प्लेक्स येथे होणार आहे, अशी माहिती पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने देण्यात आली.आयएफएससी आशियाई किड्स क्लाइंबिंग चॅम्पियनशिप २०२५ या स्पर्धेत १३ देशांतील सुमारे २०० खेळाडू सहभागी होणार असून, स्पीड क्लाइंबिंग, लीड क्लाइंबिंग आणि बोल्डरिंग या तीन थरारक प्रकारांमध्ये १३ आणि १५ वयोगटातील मुले-मुली आपले कौशल्य प्रदर्शित करतील.

ही स्पर्धा प्रत्येक भिंतीवरील चढाई ही केवळ वेग आणि कौशल्याचीच नाही, तर मानसिक एकाग्रतेची आणि धैर्याचीही परीक्षा ठरणार आहे.

स्पर्धेचे परीक्षण आयएफएससी व आयएमएफ कडून नियुक्त आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय दर्जाचे स्पर्धाधिकारी करणार असल्यामुळे स्पर्धेतील सर्व निकष जागतिक दर्जाचे राहतील.पिंपरी चिंचवड स्मार्ट सिटी मिशनच्या सहकार्याने उभारलेल्या अत्याधुनिक केंद्रात ही स्पर्धा पार पडणार असून हे केंद्र सध्या देशातील सर्वाधिक प्रगत क्रीडा सुविधांपैकी एक मानले जाते. अलीकडेच ऑक्टोबर २०२५ मध्ये पार पडलेल्या २९ व्या आयएमएफ वेस्ट झोन स्पोर्ट क्लाइंबिंग चॅम्पियनशिपने या केंद्राची गुणवत्ता आणि एमएससीएच्या स्वयंसेवकांची तयारी सिद्ध केली आहे.

या अनुभवावर आधारित, आशियाई चॅम्पियनशिपचे आयोजन अधिक दर्जेदार होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने आंतरराष्ट्रीय स्तरावरील क्रीडा स्पर्धांचे आयोजन हे शहरासाठी अभिमानाची बाब आहे. या स्पर्धेमुळे तरुण खेळाडूंना जागतिक दर्जाच्या खेळपट्टीवर आपले कौशल्य दाखविण्याची उत्तम संधी मिळणार आहे. नागरिकांनीही या स्पर्धेला मोठ्या संख्येने उपस्थित राहून खेळाडूंना प्रोत्साहन द्यावे.

— विजयकुमार खोराटे, अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

या स्पर्धेमुळे पिंपरी चिंचवड शहरातील नागरिकांना एक अद्वितीय क्रीडा अनुभव मिळणार आहे. अशा उपक्रमांमुळे युवकांमध्ये साहस, शिस्त आणि आत्मविश्वास वाढीस लागतो. महापालिका क्रीडा पायाभूत सुविधा अधिक सक्षम करण्यास कटिबद्ध आहे, आणि ही स्पर्धा त्या दिशेने एक महत्त्वाचे पाऊल ठरेल.

— पंकज पाटील, उपायुक्त, पिंपरी चिंचवड महापालिका

# पिंपरीत महिला काँग्रेसतर्फे डॉ. संपदा मुंडे यांना श्रद्धांजली!

## पोलीस भक्षक झाले, सर्वसामान्यांना न्याय कुठे? – महिला काँग्रेसचा सवाल

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : फलटण येथे आत्महत्या केलेल्या डॉ. संपदा मुंडे यांच्या निधनाने संतापलेल्या पिंपरी चिंचवड शहर महिला काँग्रेस व युवक काँग्रेसच्या कार्यकर्त्यांनी आज भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारकात श्रद्धांजली अर्पण करताना घटनेचा तीव्र निषेध व्यक्त केला.**




महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मनोज कांबळे, शिक्षण मंडळाचे माजी सभापती अभिमन्यू दहीतुले, महिला अध्यक्षा सायली नढे, युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले, वरिष्ठ उपाध्यक्ष नरेंद्र बनसोडे, संदेश नवले, अजय खराडे, चंद्रकांत लोंढे, आशा भोसले, प्रियंका सगट, प्रज्ञा जगताप, स्वाती शिंदे, सौरभ शिंदे, रोहित शेळके, जय ठोंबरे, तन्मेश इंगवले, ,गौरव चौधरी ,विशाल कसबे, प्रतीक जगताप जमीर शेख ,मयूर रोकडे, आदित्य जाधव,अनिकेत सोनवणे,शबाना शेख आदी मान्यवर उपस्थित होते.या श्रद्धांजली सभेत बोलताना महिला काँग्रेस अध्यक्षा सायली नढे यांनी पोलीस यंत्रणेवर थेट बोट ठेवले. त्या म्हणाल्या, "पोलीस भक्षक झाले आहेत! सर्वसामान्यांनी न्याय कुठे मागायचा? डॉ. संपदा मुंडे यांची आत्महत्या ही केवळ वैयक्तिक दुर्घटना नव्हे, तर राज्यातील कायद्याच्या राज्याची दयनीय अवस्था आहे. महाराष्ट्रात हगवणे प्रकरणासारख्या घटनांनी पोलीस दलाची विश्वासार्हता संपली आहे. इतर प्रकरणांमध्येही न्याय मिळत नाही, मग सामान्य नागरिक कुठे जाणार?"यावेळी कार्यकर्त्यांनी डॉ. मुंडे यांच्या फोटोसमोर दोन मिनिटे मौन पाळले आणि 'न्याय मिळेपर्यंत लढू!'च्या घोषणा दिल्या. युवक अध्यक्ष कौस्तुभ नवले यांनी सांगितले, "ही घटना राज्य सरकारच्या निष्क्रियतेचे प्रतीक आहे. फलटणसारख्या घटना वारंवार घडतात, पण दोषींना शिक्षा होत नाही. आम्ही रस्त्यावर उतरू आणि न्यायाची लढाई लढू."महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मनोज कांबळे यांनी घटनेची सखोल चौकशी करण्याची मागणी केली. ते म्हणाले, "डॉ. मुंडे यांच्या कुटुंबियांना न्याय मिळालाच पाहिजे. राज्यात अशा घटना वाढत आहेत, सरकार झोपले आहे का?"

# स्मार्ट सिटीचा 'दापोडी' हा भाग विकासापासून वंचित - सुषमा शेलार

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी चिंचवड शहर हे स्मार्ट सिटी म्हणून ओळखले जाते. या शहरात अनेक विकास कामे झाली आहेत. शहरातील प्रत्येक प्रभाग हा विकसनशील प्रभाग म्हणून ओळखला जातो, परंतु याच स्मार्ट सिटी चा एक भाग दापोडी परिसर हा विकासापासून आजही वंचित आहे, अशी खंत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या पिंपरी विधानसभा समन्वयक सुषमा शेलार यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधताना व्यक्त केली. पिंपरी चिंचवड शहर हे विकासाच्या दृष्टिकोनातून नावलौकिक मिळवलेले शहर. परंतु या शहरात दापोडी हा परिसर अनेक वर्षापासून विकासापासून वंचित



राहिला आहे. दापोडी परिसरात अशा अनेक आरक्षित जागा आहेत, ज्या विकसित होणे अत्यंत आवश्यक आहे. परंतु पिंपरी चिंचवड महानगरपालिका वतीने या जागा अनेक वर्षापासून विकसित केल्या जात नाहीये. त्यामुळे दापोडी परिसरात शाळा, उद्याने, दवाखाने तसेच नागरिकांसाठी सुविधा देणाऱ्या अनेक प्रशासकीय सुविधा या मिळत नाहीये, दरवर्षी पावसामुळे दापोडी परिसरात पूर परिस्थिती निर्माण होते. अनेकांच्या घरात पाणी शिरून अनेक कुटुंबांना नुकसान सहन करावे लागते. या पावसाळ्याच्या काळात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने या पूरग्रस्त नागरिकांना दुसऱ्या ठिकाणी स्थलांतरित केले जाते, एखाद्या शाळेत थांबविले जाते, पण ही पूर परिस्थिती का निर्माण होते, या परिस्थितीवर कायमची उपाययोजना करावी, याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष आहे. जर प्रशासनाने यावर काम केले तर अशी पूर परिस्थिती निर्माण होणार नाही, असेही सुषमा शेलार यांनी सांगितले आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेकडे अनेक वेळा आरक्षित असलेल्या जागा या विकसित करावे, नागरिकांना सोयी सुविधा पुरविले जावे, यासाठी अनेक वेळा सुषमा शेलार यांनी प्रशासनाशी पत्रव्यवहार केला आहे. परंतु प्रशासनाने त्यांच्या पत्रव्यवहारची कोणतीही दखल घेतली नसल्याचे सुषमा शेलार यांनी सांगितले. तसेच दापोडी परिसरातील या आरक्षित जागा लवकरात लवकर विकसित केल्या नाही तर आपण आमरण उपोषण करू, असाही इशारा प्रसार माध्यमांशी संवाद साधताना सुषमा शेलार यांनी दिला आहे. पिंपरी चिंचवड शहर हे जसे स्मार्ट सिटी शहर म्हणून ओळखले जाते तशीच ओळख दापोडीचीही व्हावी व दापोडी परिसरात मोठ्या प्रमाणात विकास होणे बाकी आहे, ते लवकरात लवकर व्हावे, अशी मागणी सुषमा शेलार यांनी केली आहे.

# ज्येष्ठ महिलेची एक कोटी 19 लाखांची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणे : काळ्या पैसे व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला असून, याप्रकरणात केंद्रीय गुन्हे अन्वेषण विभागाकडून (सीबीआय) कारवाई करण्यात येणार असल्याची भीती दाखवून सायबर चोरट्यांनी एका ज्येष्ठ महिलेची एक कोटी १९ लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघडकीस आले आहे.याप्रकरणी शिवाजीनगर येथील सायबर पोलीस ठाण्यात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत एका ८० वर्षीय ज्येष्ठ महिलेने सायबर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली




आहे. त्यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार, वेगवेगळ्या नावाने महिलेशी संपर्क साधण्यासाठी मोबाइल क्रमांकाचा वापर करणारे चोरटे, बँक खातेधारक यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिलेच्या मोबाइल क्रमांकावर सायबर चोरट्यांनी १६ ऑगस्ट रोजी संपर्क साधला होता. ज्येष्ठ महिलेशी संपर्क साधताना चोरट्यांनी 'व्हिडीओ का ॅल' सुविधेचा वापर केला होता. चोरट्यांनी पोलिसांसारखा गणवेश परिधान केला होता.'काळ्या पैसा व्यवहारात बँक खात्याचा वापर करण्यात आला आहे.याप्रकरणाची चौकशी सीबीआयकडून सुरू असून, याप्रकरणात तुम्हाला आणि तुमच्या पतीला अटक हो ण्याची शक्यता आहे. अटक टाळण्यासाठी तातडीने पैसे जमा करावे लागतील', अशी भीती चोरट्यांनी महिलेला दाखविले. त्यानंतर चोरट्यांनी महिलेला बँक खात्यात पैसे जमा करण्यास सांगितले. महिलेने चोरट्यांच्या खात्यात वेळोवेळी एक कोटी १९ लाख रुपये जमा केले. त्यानंतर चोरट्यांनी त्यांचे मोबाइल क्रमांक बंद केले. महिलेने याबाबत चौकशी केली. तेव्हा फसवणूक झाल्याचे उघडकीस आले. महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक स्वप्नाली शिंदे तपास करत आहेत.पंधरा दिवसांपूर्वी सहकारनगर भागातील एका ज्येष्ठ नागरिकाला कारवाईची भीती दाखवून चोरट्यांनी त्यांची एक कोटी रुपयांची फसवणूक केली होती. पहलगाम हल्ल्यातील दहशतवादी कारवाईसाठी बँक खात्यात वापर करण्यात आल्याची भीती दाखवून चोरट्यांनी फसवणूक केली होती. याप्रकरणी पोलिसांनी गुन्हा दाखल केला

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

गुरुवार दिनांक 30/10/२०२५

पिंपरी चिंचवड | पुणे

e Paper

# चिंचवडगावात उत्तर भारतीय बांधवांचा छठपुजा उत्सव दिमाखात साजरा

## महापालिकेने मुंबई चौपाटीच्या धर्तीवर येथील पवना नदी घाटाचा विस्तार करावा

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**चिंचवडगाव - दरवर्षीप्रमाणे यंदाही चिंचवडगावातील पवना नदी किनारी मोठ्या उत्साहात हनुमान मित्र मंडळ आणि छठ पूजा समिती आयोजित उत्तर भारतीयांचा पारंपरिक छठ पूजेचा भव्यदिव्य सोहळा सोमवारी ( दि. 27) रोजी उत्साहात पार पडलाघाटावर सुर्यषष्ठी महाव्रत महापूजा, छोटकी छट, भव्य गंगा आरती सह विविध, धार्मिक, सामाजिक, प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.**




आपल्या कुटूंबाला सुख, समृध्दी, आरोग्य, ऐश्वर्य लाभावे यासाठी उत्तर भारतीय महिला सूर्याची उपासना म्हणून छटपुजेचे व्रत करतात. सर्व मनोकामना पूर्ण करणारे हे व्रत असल्याची प्राचिन काळापासूनची श्रध्दा असल्याचा अनुभव येथील भाविकांनी सांगितला. यावेळी भाविकांच्या " जय छठमाता " च्या गजराने वातावरण प्रसन्न झाले होते.यावेळी छठ पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता, विनोद वाकडकर, खंडुशेठ चिंचवडे, मारुती भापकर, विशाल यादव, चिंचवडे आणि काळभोर ग्रामस्थ आदींसह हजारो उत्तर भारतीय भक्त भाविक उपस्थित होते.छठ पूजा समितीचे कार्याध्यक्ष विजय गुप्ता म्हणाले, हिंदू शास्त्रानुसार छठपूजेला सूर्यछठ अथवा छठपर्व म्हणतात. गेल्या २० ते २५ वर्षांपासून आम्ही या ठिकाणी छटपूजेचा उत्सव साजरा करत आहोत. महापालिका, पोलीस प्रशासन आणि स्थानिकांचे देखील सहकार्य या कार्यक्रमास नेहमीच असतं. उत्तर भारतीय नागरिकांची शहरात संख्या वाढली आहे. छठ पूजा कार्यक्रमास चिंचवडगावातील पवना नदी घाट अपुरा पडत आहे. त्यामुळे या घाटाचा विस्तार होणे गरजेचे आहे. महापालिकेने मुंबई चौपाटीच्या धर्तीवर येथील पवना नदी घाटाचा विस्तार करावा.या उत्सवात मोठ्या संख्येने उत्तर भारतीय कुटुंबांनी बडकी छठ (संध्या अर्ध) दिले. तसेच अखेरच्या दिवशी मंगळवारी सकाळी पवनामाईच्या पाण्यात उभे राहून सूर्यदेव बाहेर येण्याची पूर्ण भक्तिभावाने वाट पहत सूर्योदय झाल्यावर छठ मैयाचा जप करून सूर्याला अर्ध्य दिले.दरम्यान भाविकांनी सोमवारी सायंकाळी सूर्यास्ताच्या अगोदरच छटमाईची पूजा मांडत तिथे विधिवत पूजा केली होती.

या मांडणीमध्ये चारही बाजूने ऊस पुळणीत रोवून उसाचा मांडव करून त्यामध्ये पाण्याने भरलेला कलश ठेऊन त्यावर दिवा पेटवला. त्यावर विटाची मांडणी करून पूजेची मांडणी केली होती. त्यासमोर खवा, गव्हाचं पीठ आणि तुपापासून बनवलेला प्रसाद आणि फळं यांचा नैवेद्य दाखविण्यात आला होता. सूर्याचा अस्त होताना महिलांनी गाईच्या दुधाचे अर्घ्य दिले होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी छठ पूजा समिती अध्यक्ष जितेंद्र क. गुप्ता, कार्याध्यक्ष शशिकांत श्रीवास्तव, उपाध्यक्ष देवानंद आर. गुप्ता, सचिव अशोक डी. गुप्ता, सदस्य जितेंद्र जे. गुप्ता, महेश गुप्ता, प्रेम शंकर राय फिल्म प्रोड्युसर, विकास मिश्रा अध्यक्ष, पूर्वाचल विकासमंच, मुन्ना डी. गुप्ता, अनिल एस. गुप्ता, उमा के. गुप्ता, सचितानंद मिश्रा, टी. एन. तिवारी, सुभाष एम. गुप्ता, श्यामसुंदर गुप्ता, मदन आर. गुप्ता, पप्पु डी. गुप्ता, सुजित एम. गुप्ता, शंकर गुप्ता, शंभू गुप्ता, रमेश गुप्ता, भोला बी. गुप्ता, मनोज आर. गुप्ता, राजेश जे. गुप्ता, विनोद गुप्ता, संतोष गुप्ता आदींनी परिश्रम घेतले.अरविंद म्युजिकल ग्रुपचे गायक सुनिल यादव यांनी धार्मिक गीते सादर केली.

# महापालिकेच्या स्थायी समिती बैठकीत विविध विषयांना मान्यता

>>> दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी : पिंपरी चिंचवड महापालिका, पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय इमारतीतील दिवंगत महापौर मधुकर पवळे सभागृहात स्थायी समितीची बैठक संपन्न झाली. बैठकीच्या अध्यक्षस्थानी आयुक्त तथा प्रशासक श्रावण हर्डीकर होते. यावेळी सादर करण्यात आलेल्या विविध विषयांची माहिती घेत आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली व शहरात सुरू असलेल्या विकासकामांचा विभागनिहाय आढावाही घेतला.**



ऑनलाईन मा.स्थायी समिती सभा व महापालिका सभा..

या बैठकीस आयुक्त श्रावण हर्डीकर यांनी दृकश्राव्य माध्यमातून सहभाग घेतला. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, विजयकुमार खोराटे, तृप्ती सांडभोर, नगरसचिव मुकेश कोळप तसेच विषयाशी संबंधित विभागप्रमुख आणि अधिकारी उपस्थित होते.आज झालेल्या स्थायी समिती बैठकीत प्रभाग क्र. ३ चऱ्होली अंतर्गत सैनिक कॉलनी, सेव्हन हिल्स कॉलनी परिसरात विद्युत विषयक कामे करणे, पुणे-आळंदी रस्त्यापासून चऱ्होली-लोहगाव हद्दीपर्यंत विकास आराखड्यातील ९० मीटर रस्त्यावरील उर्वरित विद्युत विषयक कामे करणे, फ क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. १, ११, १२ व १३ मधील औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी चार रिक्षा टेम्पो वाहन इंधनासह प्रतिदिन भाड्याने घेणे, कमी खर्चास मान्यता देणे, महापालिकेच्या नर्सरीत शोभिवंत रोपे तयार करून देखभाल करणे, ई क्षेत्रीय कार्यालयाकडील अंदाजपत्रकातील सन २०२५-२६ च्या अंदाजपत्रकातील चालू विकासकामांच्या तरतुदींमध्ये वाढ व घट करणे, क क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्र. २, ८ व ९ मधील पाणीपुरवठा ट्रेचेसचे मजबुतीकरण करून डांबरीकरण करणे तसेच पेव्हिंग ब्लॉकची आवश्यकतेनुसार दुरुस्ती करणे, प्रभाग क्र. २१ मधील अभिमन्यू चौक ते म्हाडा प्रकल्पापर्यंत रस्त्यांचे काँक्रीटीकरण करणे कामी मूळ सल्लागाराकडून नव्याने करारनामा करणे, महानगरपालिकेच्या आर.ई.एफ. फॉर लोकल एरिया प्लॅन करिता सल्लागार नेमणे, पुणे ग्रँड चॅलेंज टूर (PGCT) अंतर्गत विनोदे वस्ती चौक-डी.वाय. पाटील कॉलेज आकुर्डी येथे पायाभूत सुविधा करणे, अ क्षेत्रीय कार्यालय परिसरातील शौचालय देखभाल, दुरुस्ती व साफसफाई कामाकरिता नवी दिशा या योजनेंतर्गत महिला बचत गटांना देण्यात आलेल्या स्वच्छता कामासाठी लहान जेटिंग मशीन खरेदी करणे, वैशालीताई काळभोर महिला बचत गट यांच्या सार्वजनिक व सामुदायिक शौचालयांच्या देखभाल व दुरुस्ती कामकाजास मुदतवाढ देणे, प्रभाग क्र. ९ मधील आरक्षण क्र. ६६ (पीएमपीएमएल म.रा.वि.वि.कं.लि.) यांस सुरक्षा ठेव व इतर बाबींसाठी रक्कम अदा करणे, मे. रामचंद्र इंटरप्रायझेस यांचे औष्णिक धुरीकरणासाठी तीन चाकी चारचाकी वाहन इंधनासह प्रतिदिन भाड्याने घेणे, ह प्रभागांतर्गत सन २०२३-२४ करिता पिंपरी चिंचवड हद्दीबाहेर आवश्यकतेनुसार टँकरने पाणीपुरवठा (शेवाळेवाडी) कामाच्या सुधारित वाढीव खर्चास मान्यता देणे, महापालिकेच्या विविध विभागांच्या संगणक प्रणालींच्या देखभाल व दुरुस्ती कामाकरिता मुदतवाढ देणे, यासह विविध विषयांना मान्यता देण्यात आली.

याशिवाय स्थायी समिती अधिकारांतर्गत मा. प्रशासक यांच्याकडील महापालिकेच्या रहाटणी सर्वे नं. ९६, लांडेवाडी, दिघी, चऱ्होली, बोपखेल, कृष्णानगर से.२२, पाटीलनगर, जाधववाडी से.१०, गवळी माथा, सांगवी गावठाण, सांगवी पीडब्ल्यूडी, सांगवी स.नं. ८४, पिंपळे गुरव, दापोडी, थेरगाव गावठाण, थेरगाव स.नं. ९, थेरगाव लक्ष्मणनगर, काळाखडक वाकड, काळाखडक बुस्टर व पुनावळे येथील पंपहाऊसचे चालन करण्याच्या सुधारित खर्चास मान्यता देणे, प्रभाग क्र. २५ मधील वाकड येथील आरक्षण क्र. ४/२३ मध्ये शाळेचे ग्राउंड डेव्हलपमेंट, फर्निचर व आवश्यकतेनुसार स्थापत्यविषयक कामे करण्याच्या तरतुदींमध्ये वाढ/घट करण्यास मान्यता देणे आदी विषयांना येणाऱ्या खर्चास प्रशासक श्रावण हर्डीकर यांनी मान्यता दिली.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 9657409579